अहमदनगर जिल्हा परिषद
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

ई-निविदा सूचना सन- २०२१-२२ (पहिली वेळ)
निविदा क्र. जि.प.ग्रापापु /निविदा/५२/ २०२१

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांचेमार्फत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अंतर्गत मंजुर असलेल्या खालील तक्यात नमुद केलेल्या कामाच्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे ब-१ निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम	निविदा शुल्क	कंत्राटदाराचा वर्ग	काम पुर्ण करावयाची मुदत
1	**कुकाणा येथील दर्गा जवळ बोरवेल मध्ये मोटार व सोलर प्लँन्ट बसविणे.**	400006/-	112/-	सुशिक्षित बेरोजगार अभियंता	3 Months

:- ई निविदा भरण्याकरीता सामान्य सूचना

वरील तक्त्यामधील मागविण्यात आलेल्या कामाच्या ई निविदा, ग्रामविकास विभाग / जिल्हा परिषदेकडे खालील तक्यांत नमुद केलेल्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे मागविण्यात येत आहेत.

ई निविदा भरण्याकरीता सामान्य सूचना महाराष्ट्र शासनाच्या वेब पोर्टल http://mahatenders.gov.in वर दिलेल्या आहेत.

कंत्राटदाराची नोंदणी:

ई निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छुक कोणत्याही कंत्राटदाराने कोणत्याही जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडील नोंदणी असणे आवश्यक असुन त्याचा नोंदणी वर्ग व प्रवर्गानुसार महाराष्ट्राच्या वेब पोर्टल http://mahatenders.gov.in मार्फत ई निविदा भरण्यात यावी.

डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC)

प्रत्येक कंत्राटदारास वर नमुद केलेल्या वर्ग व प्रवर्गानुसार ई निविदा भरण्यासाठी डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (**DSC**) आवश्यक आहे. सदर रक्कम भरल्यानंतर मान्यताप्राप्त नॅशनल इंफॉरमॅटिक सेंटर (NIC) यांचेकडुन देण्यात येते, त्याकरीता निविदेची आवश्यकता नाही. तपशीलवार माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे. डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (**DSC**) हे युएसबी ई -टोकन स्वरुपामध्ये देण्यात येते.

निविदा कागदपत्रांचे जमा करणे:-

- ठेकेदार डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र वापरुन नमुद केलेल्या वेबसाईटवर लॉग इन करुन इंटरनेट वरुन एनआयटी व निविदा कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पदधतीने शोधुन व डाउनलोड करु शकतात. निविदा कागदपत्रे सादर करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.
- एकापेक्षा जास्त कामांमध्ये भाग घेण्याची शक्यता: सामान्यत: कोणताही कंत्राटदार त्याच्या काम करण्याची ऐपत आणि आर्थिक क्षमतेनुसार कोणत्याही विशिष्ट एनआटीमध्ये जास्तीत जास्त काम करण्याची निविदा गोळा करुन सादर करु शकतो.

निविदा सादर करण्याची प्रक्रियाः

- निविदा भरण्याच्या अनुज्ञेय तारखेस व अंतिम दिनांक व वेळेपूर्वी निविदा दोन फोल्डर्स मध्ये (तांत्रिक प्रस्ताव आणि आर्थिक प्रस्ताव) ऑनलाईन सादर करावयाच्या आहेत.
- सदर निविदा अपलोड करताना डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र वापरुन, विहित स्कॅन करुन डिजीटल स्वाक्षरी केलेले कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे, अशी कागदपत्रे स्वयंचलितपणे कूटबध्द (न वाचनीय स्वरुपात रुंपातरीत) होतील.

तांत्रिक प्रस्तावः-

दोन फोल्डर्स पैकी तांत्रिक प्रस्तावात खालील बाबींच्या स्कॅन प्रती असणे आवश्यक आहे.

वैधानिक लिफाफयामधील बाबीः-

१. निविदा शुल्क व बयाणा रक्कम (ईएमडी) :- नमूद शुल्क व रक्कम, ऑनलाईन पैसे भरण्याची पावती किंवा नेट बॅकिंगद्वारे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, बुरुडगाव रोड, शाखा अहमदनगर येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहमदनगर यांच्या खात्यात खाते क्र. 33991302872 IFSC कोड SBIN 0008991, MCER code 414002004, BRANCH code 08991 आहे. पावती किंवा नेट बँकिंग भरणा केल्याचे चलन/काउंटर फाईलची स्कॅन केलेली प्रत तांत्रिक कागदपत्रासह सादर करावी लागणार आहे.
२. निविदा शुल्क व ईएमडी रक्कम चुकीची आढळल्यास निविदा अवैध मानले जाईल.
३. महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा ग्रामविकास विभागाने दिलेल्या वैध नोंदणीची प्रत.
४. जी.एस.टी. प्रमाणपत्राची प्रत नोंदणी प्रमाणपत्र.
५. पॅन कार्डची प्रत.
६. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयानुसार, जर निविदाधारक बीओक्यु रकमेपेक्षा १० टक्के कमी दराची निविदा भरत असेल तर त्याने आगाऊ स्वरुपात सुरक्षा ठेव डिमांड ड्राफट च्या स्वरुपात भरणे आवश्यक आहे. निविदाधारकाने १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त कमी दराची निविदा भरल्यास इतक्या कमी दराने कामाचा दर्जा योग्य राखून काम कसे पूर्ण करणार याबाबतचा सविस्तर लेखी खुलासा स्वाक्षरीसह कार्यालयात अर्थिक लिफाफा उघडल्या नंतर पाच दिवसात सादर करावा.
७. सुरक्षा ठेव रक्कम डिमांड ड्राफट च्या स्वरुपात आर्थिक लिफाफा उघडल्यानंतर आठ दिवसाचे आत संबंधित जिल्हा परिषद कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे.
८. डी.डी. कार्यकारी अभियंता जि.प.ग्रा.पा.पु. विभाग अहमदनगर यांच्या नावे असावेत, तसेच डी.डी. फक्त राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेचे असावेत. कामाचे नाव डी.डी.च्या मागील बाजुवर लिहिणे बंधनकारक आहे.
९. राज्य दर सुचीनुसार कामाच्या अंदाजपत्रकामधील काही बाबीमध्ये स्काडा (SCADA) ची अट नमूद असल्यास देयक सादर करतांना संबंधित ठेकेदार व उपअभियंता यांनी प्रमाणीत केलेल्या स्काडाच्या मुळ पावत्या न जोडल्यास स्काडा असलेल्या बाबीच्या मुल्यांकनामध्ये १०टक्के कपात करण्यात येईल.
१०. कॉंक्रीट कामाकरीता मोबाईल कॉक्रीट मिक्सर /आरएमसी प्लॅंट /व्हायब्रेटर/ट्रीमिक्स मशिन स्वमालकीचा किंवा भाडेतत्वावर असल्याचे विहित मुदतीसह करारनामा जोडणे आवश्यक आहे.
११. कॉंक्रीटच्या कामाकरीता कॉक्रीट मिक्सर व नीडल व्हायब्रेटर वापरणे आवश्यक आहे.
१२. या कामाची निविदा सहभाग नोंदवताना सबंधीत निविदाधारकाने यापूर्वी मिळालेली कामे योग्य कारणाशिवाय मुदतवाढीनंतरही विहित मुदतीत पूर्ण केलेली नसतील असे निविदेच्या कोणत्याही स्तरावर लक्षात आल्यास सदर निविदाधारकास अपात्र केले जाईल.

१३. विमा पॉलिसीच्या संचालकांनी ठरविल्यानुसार कंत्राटदाराने आवश्यक विमा पॉलीसी (अर्थात ठेकेदाराची सर्व जोखीम विमा पॉलिसी, विमा पॉलिसीच्या विम्यास निर्माण होण्याचे जोखीम इ.) नियंत्रक करणे आवश्यक आहे. म्हणून कंत्राटदाराने केवळ "विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" कडुन संपुर्ण कराराचे मूल्य आणि संपुर्ण कराराचा कालावधी सामाविष्ट करुन देण्यात आलेल्या अनुदानाच्या कामाच्या अंमलबजावणीसाठी पुरेसा विमा संरक्षण द्यावा लागेल.पत्रव्यवहाराचा पोस्टल पत्ता २६४,म्हाडा, पहिला मजला, कलानगर, बांद्रा (ई), मुंबई-४०० ०५१ आहे. (दूरध्वनी क्र.२६५९२४६१/२६५९०४०३) त्याचप्रमाणे करारातील काम पुर्ण करण्यासाठी नेमलेल्या सर्व कर्मचा-यांना कामगारांच्या भरपाईनुसार विमा काढणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही कंपनीकडुन घेतलेल्या अधिकृत प्रोव्हायडर पॉलिसीद्वारे विमा पॉलिसी स्वीकारली जाणार नाही. व शासकीय विमा निधीद्वारे प्रीमीयम वसुलीची अंमलबजावणी केलेल्या कंत्राटदाराला देय रकमेमधुन थेट वसूल केली जाईल आणि विमा कंपनीला दिला जाईल. महाराष्ट्र स्टेट, मुंबई, विमा संचालक, इन्शुरन्समध्ये विम्याचे जोखीम वाटप करण्याचा अधिकार राखून ठेवतात. अंमलबजावणी दरम्यान दस्तऐवज साइटवर उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१४. समान कामाचा काम पुर्णत्वाचा दाखला.

अ) नवीन नोंदणी झालेले (पुढील वर्गीकरण नाही) ठेकेदारांना मागील तीन वर्षातील सारख्या कामाच्या अनुभवाच्या दाखल्याची अट लागू राहणार नाही. सदर बाब ठेकेदाराने रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर स्वयमं घोषणापत्र सादर करावे.

ब) सारख्या कामाच्या अनुभवाचा दाखला सादर करावयाच्या पुराव्याच्या कागदपत्रात अ)कामाचे नाव ब)ठेकेदाराचे नाव क)निविदा रक्कम ड) कामाच्या कार्यारंभ आदेशानुसार काम सुरु करण्याचा महिना व वर्ष आणि प्रत्यक्ष काम पुर्ण झाल्याचे महिना व वर्ष आणि केलेल्या कामाच्या बाबी इ.असावे.

क) सारख्या कामाच्या अनुभवाचा दाखला सादर करावयाच्या पुरावा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, निमसरकारी, जिल्हा परिषद विभागातील कामाचे कागदपत्रांचा विचार केला जाईल. नमुद केलेली कागदपत्रे कार्यकारी अभियंता अथवा उप अभियंता हे राज्य शासनाचे / केंद्र शासनाचे किंवा समांतर दर्जाचे अधिकारी यांचेद्वारे प्रमाणित केलेले असावे.

१५. **तांत्रिक कामाचा अनुभव (१४-अ लागु नसल्यास) :-**

सारख्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१६. कंत्राटदाराने ई निविदा सादर करतांना वैधानिक लिफाफयातील कागदपत्रे आपलोड करण्या पुर्वी स्वतः कागदपत्रावर पान क्रमांक व एकुण पान क्रमांक खाली दिलेल्या पध्दतीने सर्व पान क्रमांक टाकून पृष्टांकीत करुन पीडीएफ फाईल लिफाफा क्रमांक १ मध्ये अपलोड करावी अपलोड करण्यात येणा-या कागदपत्रांवर पृष्टक्रमांक नमुद नसल्यास सदर निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही

डिजीटल स्वाक्षरी	पान क्रमांक	एकुण पान क्रमांक

- **निविदा स्पर्धेतुन माघार घेतल्यास दंडात्मक कार्यवाही :-** तांत्रिक लिफाफयाच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदारानी **माझा आर्थिक देकार उघण्यात येऊ नये अथवा मी स्पर्धेतुन माघार घेत आहे.** असे पत्र दिल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येऊन त्याचा आर्थिक देकार उघडण्यात येईल व संबधित ठेकेदारावर निविदा मुल्यांकन समिती दंडात्मक कार्यवाही करु शकते.

आर्थिक प्रस्ताव:-

आर्थिक प्रस्तावामधील एका लिफाफयामध्ये खालील कागदपत्रे असावेत.

१.परिमाणांचे बिल (बी.ओ.क्यु.) :- ठेकेदाराने बी.ओ.क्यु.मध्ये दर टाकण्यासाठी चिन्हांकित केलेल्या जागेवर दर (वरील किंवा खालील टक्केवारी) इंटरनेटच्या माध्यमातुन भरणे आवश्यक आहे.

२.कंत्राटदार त्या प्रती अपलोड करण्यापुर्वी डाऊनलोड करु शकतात. भरलेले दर ठेकेदाराने कागदपत्रे स्कॅन करुन डिजीटल स्वाक्षरीने सादर करावेत.

सामान्य सूचनाः-

१. भाववाढ अनुज्ञेय नाही.
२. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर जर निविदाधारकाने दुस-या एजन्सीला काम पुर्ण करावयास द्यावयाचे असेल तर त्याने देय रकमेच्या ०.५ टक्के किमतीची रक्कम भरणा जि.प.कडे करावा , काम दुस-या एजन्सीला देण्याची परवानगी सक्षम अधिका-याची घ्यावी लागेल.
३. शासन निर्णय परिपत्रक क्र.२०१८/पारा/कार्या १९८/बांध-४ दि.१२/१०/२०१८ अन्वये कामगार कल्याण मंडळावर कर्मचा-यांची नावे नोंदवली गेलेली असावीत.
४. ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक दि.५/१०/२००८ अन्वये कामावर येणारे मजुरांचा विमा कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी घेतलेला असावा.
५. ठेकेदाराने द्यावयाचे स्वयमं घोषणापत्र परिशिष्ट-२ नुसार सादर करावे. परिशिष्ट-२ मधील कामाचे नाव व्यवस्थित लिहावे आणि समान भाषेत असावे. स्कॅन करुन अपलोड केलेल्या स्टॅम्पची मुळ प्रत आठ दिवसात कार्यालयास निविदा उघडल्यानंतर सादर करावा. अपलोड केलेला स्टॅम्प व मुळ स्टॅम्प सारखा नसल्यास शासकिय गुन्हा समजण्यात येईल.
६. अपलोड केलेल्या कागदपत्राची तपासणी करताना मुळ कागदपत्रे सारखे आढळुन न आल्यास ठेकेदार शिक्षेस पात्र होईल व आवश्यकता वाटल्यास पोलीस कार्यवाही केली जाईल.
७. आर्थिक लिफाफा उघडल्यानंतर ठेकेदारास माहिती स्वयंचलित दुरध्वनीवर (मोबाईल) पाठवली जाईल व ते आर्थिक लिफाफा पाहु शकतील त्याकरीता दुसरी कोणतीही कार्यवाही किंवा पत्रव्यवहार केला जाणार नाही. यशस्वी व सर्वात कमी दर असणा-या ठेकेदाराने लागणारी कागदपत्रे आणि बी-१ मधील विशिष्ट करारनाम्यासहित अनामत रक्कम, कर्मचा-यांच्या विमा निविदा उघडल्यानंतर १५ दिवसात सादर करावा जर निविदाधारकाने मुदतीत कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्याचा निविदेवर हक्क राहणार नाही. कालक्रमानुसार दुसरा निविदाधारकास बोलविण्यात येईल, वाटाघाटीसाठी आणि वाटाघाटीनुसार जर त्यांनी पहिल्या निविदाधारकांच्या त्याच किंवा कमी दराने काम करण्यास तयार असेल अशा दुस-या निविदा धारकास काम देण्यात येईल.

एकापेक्षा जास्त निविदेमध्ये भाग घेण्याचा पात्रता निकषः-

प्रत्येक्षात पुर्ण केलेल्या कामाचा सारख्या कामाचा अनुभव दाखल्याच्या कागदपत्राचा पुरावा हा वेगवेगळे कामासाठी वापरण्यात यावा.

दिशाभुल करणे/खरी माहिती दडविल्यास दंडात्मक कार्यवाहीः-

कागदपत्रे तपासणी दरम्यान मूळ कागदपत्रे आणि अपलोड केलेली कागदपत्रे एक नसल्यास ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही जसे परवाना निलंबित करणे/ परवाना रद्द करणे आणि आवश्यक असल्यास पोलिस कार्यवाही केली जाईल.

कंत्राटदाराचे कर्तव्य व भरावयाचे कर :-

कंत्राटदाराने आयकर, जीएसटी, रॉयल्टी, कामगार कल्याण उपकर आणि इतर सर्व वैधानिक आकारणी/सेस/ ऑक्ट्रॉय भरावयाचे असलेले कर आणि कर्तव्य या सर्व शुल्काचा विचार करुन त्यानुसार बीओक्यु मध्ये दर भरावा.

निविदा भरण्यापुर्वी जागेची पाहणीः-

कोणतीही निविदा भरण्यापुर्वी ठेकेदाराने जागेची वास्तविक , स्थानिक तपासणी केली पाहिजे आणि काम करतानीच्या अडचणी लक्षात घेतल्या पाहिजेत.काम करताना काही अडचणी आल्यास त्याचा दावा करु नये.

शर्तीसह व अपुर्ण निविदा:- निविदाधारकामार्फत शर्तीसह व अपुर्ण निविदा असल्यास निविदाधारकास बाद करण्यात येईल.

निविदा उघडणे व तपासणी करणे:-

निविदा मुल्यांकन समिती:-

निविदा मुल्यांकन समिती शासन निर्णय क्र.एमआयएससी/२०१० /२७५/सीआर /पॅरा-७/११ दि.१९/१०/२०११ अन्वये निविदा कागदपत्रे प्रसिध्द करण्याकरीता व कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता तयार करण्यात आली असून निविदेच्या कामाच्या ठेकेदाराची कागदपत्रांची तांत्रिक मुल्यांकन व आर्थिक मूल्यांकन करण्याकरीता कार्यरत राहील.

तांत्रिक लिफाफा उघडणे:-

१. तांत्रिक लिफाफा शासनाच्या ठरावानुसार निविदा समिती सदस्यांनी किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या इलेक्ट्रॉनिक पदधतीने दिलेल्या वेबसाईटवरुन डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्राने उघडला जाईल.
२. निविदाधारकांनी इच्छा असल्यास निविदा उघडतेवेळी ते उपस्थित राहु शकतात.
३. तांत्रिक दृष्टया वैधानिक कागदपत्रासाठी तांत्रिक लिफाफा प्रथम उघडले जाणे आवश्यक जाणे आहे. कागदपत्रामध्ये काही कमतरता असल्यास संबंधित निविदाधारकाची निविदा नाकारली जाईल.
४. अवैधानिक लिफाफयातील कागदपत्रे डिक्रिप्ट(वाचनीय स्वरुपात रुपांतरीत) डाऊनलोड केली जातील आणि निविदा मूल्यांकन समितीकडे सादर केली जातील.

तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांची यादी प्रसिध्द करणे(प्रथम फेरी):-

तांत्रिक मूल्यांकन समितीच्या छाननी व निर्णयाच्या अनुषंगाने पात्र निविदाधारकांची सारांश यादी आणि त्यांच्या अनुक्रमांकानुसार कामाचे आर्थिक प्रस्ताव विचारात घेऊन ते वेबपोर्टलवर अपलोड केले जातील.

निविदा उघडणारे सक्षम प्राधिकरण :-

नाव /पद/ ई मेल आय डी

BO 1*	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर	ceonagar_anr@rediffmail.com
BO 2*	अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर	ceonagar_anr@rediffmail.com
BO 3*	मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अहमदनगर	zpnagar_cafo@rediffmail.com
BO 4*	कार्यकारी अभियंता सा.बां.दक्षिण /उत्तर/ग्रापापु/ ल.पा. जि.प.अहमदनगर	eebcs_nagarzp@rediffmail.com eemi_nagarzp@rediffmail.com eebcn_nagarzp@rediffmail.com
BO 5*	संबंधित खातेप्रमुख, जि.प.अहमदनगर	

दि.१९/१०/२०११ च्या शासन निर्णयानुसार BO 1* किंवा BO 2* आणि BO 3*, BO 4*,BO 5* पैकी एक. निविदा समिती निविदेची छाननी तपासणी करताना, संबंधित निविदा धारकास स्पष्टिकरण मागु शकते. जादा कागदपत्रांची मागणी करु शकते किंवा त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची मुळ प्रत मागू शकते. निविदाधारकाने आवश्यक कागदपत्रे विहित कालावधीत सादर न केल्यास, त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

अपील करण्याची तरतूद व त्याचा निकालः-

१. निविदा मूल्यांकन समितीचा निर्णय, एखाद्या निविदाधारकास मान्य नसेल, तर तो लेखी स्वरुपात (फॅक्स/ई मेल किंवा स्पीड पोस्ट) मुख्य कार्यकारी अधिकारी/अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस, पात्र निविदाधारकांची यादी अपलोड केलेल्या तारखेपासुन २४ तासांचे आत अपील करु शकतो. सदर अपीलाची प्रत कार्यकारी अभियंता सा.बां.दक्षिण /उत्तर, ग्रापापु, लपा विभाग यांनाही पाठवावी लागेल.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी/ अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर (अपिलीय प्राधिकरण) यांनी अपीलकर्ता निविदाधारकाचे म्हणणे ऐकुन व निविदा मुल्यांकन समिती सदस्यांशी पुढील कार्यालयीन दिवसात संपर्क करुन निर्णय घ्यावा व अपीलाचा निवाडा करुन, तसे संबंधित निविदा धारकास कळविण्यात येईल.

तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांची यादी अंतिमरित्या प्रसिध्द करणे.

अपिलीय प्राधिकरणाने जर निविदा मागविलेल्या विभागास अपिल केलेल्या निविदाधारकाची निविदा स्विकृत करणेबाबत विचारणा केली तर, आवश्यक शुध्दीपत्रक काढुन, पात्र निविदा अपलोड करण्याची प्रक्रिया परत करण्यात येईल. आर्थिक लिफाफा उघडण्याची तारीख अंतिम गोषवारा यादीत नमुद केली जाईल.

आर्थिक निविदा उघडणे व मूल्यांकन करणे.

१. निविदा मूल्यांकन समितीने, तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या निविदाधारकांचा आर्थिक प्रस्ताव,वेब पोर्टलवरुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उघडला जातो. सदर आर्थिक प्रस्ताव निविदाधारकाची अंतिम यादी प्रसिध्द केल्याचे तारखेनंतर २४ तासांत किंवा कार्यकारी अभियंता जि.प.ग्रापापु विभाग अहमदनगर यांना सोयीस्कर पडणा-या तारखेस उघडण्यात येतो.
२. सदर गोपनीय प्रती खुल्या केल्या जातील व नमूद केलेले दर निविदाधारकांना वाचण्याकरीता उपलब्ध केले जातील.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना आवश्यक अभिप्राय दिल्यानंतर व तपासणी केल्यानंतर दरांचा तुलनात्मक तक्ता, कार्यकारी अभियंता जि.प.ग्रापापु विभाग अहमदनगर यांचेकडुन अपलोड केला जाईल. या तक्त्यांमध्ये कंत्राटदाराचे नाव प्रत्येक कामासमोर त्याने नमूद केलेला दर इत्यादी तपशील असावा,परंतु प्राप्त दर हे योग्य वाजवी आणि अजुन कमी होण्यास वाव नसल्याची खातरजमा केलेली असावी
४. अशा पात्र व अंतिम निविदा धारकांची यादी वेब पोर्टलवर शुध्दीपत्रकाद्वारे अपलोड करण्यात येईल.
५. निविदा स्विकृती प्राधिकरण कोणत्याही निविदाधारकास त्याने नमुद केलेल्या दर योग्य आहेत का याचे पृथःकरण करण्यास सांगु शकते.

निविदा स्विकृतीः-

सर्वात कमी पात्र दराची निविदा स्वीकारण्यात येईल. परंतु निविदा स्विकृती प्राधिकरण/ कार्यकारी अभियंता यांच्यावर ते बंधनकारक नाही व कोणतीही किंवा सर्व निविदा योग्य कारणास्तव फेटाळण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत, तसेच एक काम, एकापेक्षा जास्त निविदाधारकांना विभागुन देण्याचा अधिकारी राखून ठेवण्यात आला आहे.

निविदा स्विकृतीनंतर अतिरिक्त बयाणा रक्कम/ सुरक्षा अनामत रकमेची अदायगीः-

ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृतीसाठी पात्र ठरलेली आहे, त्याने निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यानंतर दहा दिवसाच्या आत बॉंड पेपरवर विहित करारनामा-प्रतीत कार्यकारी अभियंता यांना करुन दयावयाचा आहे. सदर करारनामा शासनाच्या प्रचलित नियम/निर्णयानुसार किमतीचा असावा.

यशस्वी निविदाधारकांनी २ टक्के अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे नावें असलेला बंद लिफाफ्यात सादर करावाचा असुन निविदेची सर्व कागदपत्रांची पुर्तता करावयाची आहेत.

अयशस्वी निविदाधारकाची बयाना रक्कम परत करणे-

अयशस्वी निविदाधारकाने भरलेली बयाना रक्कम परत मिळणेसाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे, कामाचे नांव, तपशिल, निविदा क्रमांक , तारीख, बयाना रक्कम भरलेली पध्दत व रक्कम इत्यादी तपशिलासह अर्ज करावयाचा आहे. दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार स्विकृत केलेला सर्वात कमी दराचा निविदाधारक वगळता, इतर सर्व निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

देयक अदायगी:- कोणतेही काम झालेनंतर केलेल्या कामाचे धावते किंवा अंतिम देयक , निधी उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल. देयक अदायगी विलंबाबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही/ प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

साहित्य पुरवठा:- कामासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावयाचे आहे.

विहित तारखांचे वेळापत्रक:-

टीप:- दिवस म्हणजे शनिवार-रविवार -सरकारी सुट्टया वगळुन कार्यालयीन कामाचे दिवस तांत्रिक/ आर्थिक निविदा उघडण्याच्या तारखा संभाव्य आहेत, यामध्ये काही बदल झाल्यास तसे शुध्दीपत्रक प्रसिध्द केले जाईल.

निविदेची पुर्ण प्रक्रिया ऑनलाईन (ई टेंडरींग) पध्दतीने केली जाईल. शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरुन, निविदा कागदपत्रे डाऊनलोड करण्याबाबत मार्गदर्शनपर सुचना आणि ऑनलाइन निविदा सादर करणे व निविदा उघडणेची कार्यपध्दती डाऊनलोड करता येईल.

कंत्राटदाराने डिमांड ड्राफ्टची मूळ प्रत, निविदा कागदपत्रे डाऊनलोड केल्यानंतर सादर करावी. सदर डिमांड ड्राफट मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.अहमदनगर येथे देय असलेला या नावे असावा व तो कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात समक्ष सादर करावा.

निविदेबरोबर स्कॅन करुन सादर केलेल्या बँक चलनाची प्रत असावी.

http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरुन विहित तारखेनुसार तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांचे कार्यालयात ऑनलाईन उघडल्या जातील.

विहित तारखांमध्ये काही बदल झाल्यास, आर्थिक लिफाफा उघडण्याची तारीख व वेळ, संबंधित निविदाधारकास ई-मेलदवारे कळविण्यात येईल.

निविदाधारकाने सादर केलेली निविदा, निविदा उघडण्याच्या तारखेपासुन १२० दिवस वैध राहील. निविदा अर्जातील सर्वसाधारण नियमातील परिच्छेद क्र-२ पहा.

यशस्वी कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांनी निर्देशित केलेनुसार सुरक्षा अनामत रक्कम विहित वेळेत जमा केली नाही व निविदेतील करारनाम्यातील कागदपत्रांची पुर्तता केली नाही तर बयाना रक्कम जप्त केली जाईल. इतर वेळी बयाना रक्कम परत करता येईल.

आराखडे व कामाचे ठिकाण तपासणे-

निविदाधारकाने स्वखर्चाने व काळजीपुर्वक आराखडे, निविदेतील अटी, निर्देश इतर यांची तपासणी करावी. त्याने कामाच्या जागेची पाहणी करावी. व तेथील वातावरण भौतिक/इतर परिस्थीती/निसर्ग, अस्तीत्वातील व आवश्यक तपासणी, दळणवळणाची साधणे, व गोडावुन माल साठवणुक जागा इतर बाबत स्वत: अवगत करुन घ्यावे.

निविदेवर परिणाम,प्रभाव, होणा-या बाबी इतर परिस्थीती बाबत आवश्यक माहिती कंत्राटदाराने प्राप्त करुन घ्यावे. वरील बाबतीत कोणतीही भरपाई जिल्हा परिषद किंवा शासनाकडुन मिळणार नाही. निविदा कागदपत्रातील सुचना अथवा शंका अथवा संदिग्धता असेल तर, त्याने निविदा कालावधीच्या ३ दिवसात कार्यकारी अभियंता यांना लेखी पत्र दयावे.

सदर निविदेबाबत आवश्यक्यता असल्यास कोणतेही शुध्दीपत्रक फक्त http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल. कोणतीही किंवा सर्व निविदा कारणांशिवाय फेटाळणे किंवा रदद करण्याचा अधिकारी सक्षम प्राधिका-याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

अ.नं	प्रक्रिया तपशिल	दिनांक
१	निविदा प्रसिध्द करणे, निविदा सुचना व निविदा कागदपत्रे अपलोड करणे (ऑनलाईन)	२४/११/२०२१ १७.००
२	तांत्रिक व आर्थिक लिफाफा डाऊनलोड करणे व सादर करणे	३०/११/२०२१ १७.००
३	तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारीख	०१/१२/२०२१ १५.००
४	तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेले पात्र निविदाधारकांची यादी अपलोड करण्याची तारीख	०२/१२/२०२१ १५.००
५	आर्थिक लिफाफा/निविदा उघडण्याची तारीख	०३/१२/२०२१ १५.००
६	आर्थिकदृष्टया पात्र ठरलेले निविदाधारकांची यादी अपलोड करण्याची तारीख	०६/१२/२०२१ १५.००

कामाचे नाव :- **कुकाणा येथील दर्गा जवळ बोरवेल मध्ये मोटार व सोलर प्लॅन्ट बसविणे.**

कार्यकारी अभियंता
जि.प. ग्रा.पा.पु. विभाग अहमदनगर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

Providing 4 KW OFF grid solar water pack at kukana dargarh area at kukana tal. Newasa dist. ahmednagar

DECLARATION OF THE AGENCY

Name of Work :- ----------**Tender Notice No :-** ----------

I / We hereby declare that

1. I / We interested in the above named work in the tender notice.
2. I / We have submitted a bid for the said work.
3. I / We have made myself / ourselves thoroughly conversant with the local conditions regarding all materials and labour on which I / We have based My / our rates for this tender. The specifications and leads on this work have been carefully studied and understood before submitting this tender. I / We undertake to use only the best materials approved by Committee or his duly authorized assistant during execution of the work and to abide by the decisions .
4. I / We accept all the terms and conditions laid down in the tender documents.
5. The rate quoted by me / us is unconditional; I / We understand that conditional tender is liable for rejection.
6. I/ We here by declare that I / We am are not connected directly or indirectly with the services of Central Government or Zilla Parishad and Panchyat Samitti

परिशिष्ट – १

नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी ---------- वय वर्षे ---------- राहणार ---------- या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहून देतो की, मी ---------- या फर्म चा / कंपनीचा मालक असून ---------- या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्र १ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी , बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रृटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण महिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहमदनगर या कार्यालयास कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत सतेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
२. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर , अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास , मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदाराची सही / शिक्का